मुकुंद कुळे

भारतीय शास्त्रीय संगीताची अमीट मुद्रा संपूर्ण जगावर उमटलेली असताना, 'भारतीय संगीत म्हणजेच शास्त्रीय संगीत, हे काही खरं नाही,' असं कुणी म्हणालं तर!

अनेकांना संगीतातलं काहीही कळत नाही, तरीही 'जगातल्या प्रत्येकाला संगीत कळतं,' असं कुणी ठामपणे सांगितलं तर!

घराणी ही शास्त्रीय संगीताची खासीयत असताना 'घराणी फक्त शास्त्रीय संगीतात नसतात, ती प्रत्येक प्रकारच्या संगीतात असतात,' असं मत कुणी आग्रहाने मांडलं तर!

...कदाचित असं म्हणणाऱ्याला सारे वेडा ठरवतील. पण ही विधानं म्हणजे वेडेपणा नसतो. त्यामागे जवळ जवळ अर्धशतकाची तपश्चर्या असते. एका साधकाची तपःपूत संगीततपस्या. म्हणूनच त्या तपस्व्याच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या संगीतविषयक एकेका बोलाला लाखमोलाचं वजन असतं. केवळ शास्त्रीय संगीत नाही, तर भारतातील विविध संगीतप्रवाहांचा सातत्याने काटेकोर अभ्यास-संशोधन करणारे आणि चिंतन-मनन करून त्यावर सोदाहरण भाष्य करणारे हे संगीतसाधक आहेत- अशोक दा. रानडे.

केवळ अशोक दा. रानडे हे नाव ऐकल्या-पाहिल्यावरच अनेकांचे हात कळत नकळत कानाच्या पाळीला लागतात. कारण आजमितीला एकूणच संगीताची चिकित्सा करणारा त्यांच्याइतका ज्ञानी पुरुष अभावानेच सापडेल. पण या ज्ञानाचं नस्तं अवडंबर ते माजवत नाहीत किंवा आपल्या ज्ञानाने समोरच्याला दिपवूनही टाकत नाहीत. उलट त्यांना भेटल्यावर, त्यांच्याशी बोलल्यावर त्यांच्याइतका ऋजू, सात्त्विक माणूस दुसरा नसेल, असंच प्रत्येकाचं मत होतं. इतकं रानडेसर शांत आणि धीम्या लयीत बोलत असतात. जणू एखादी विलंबित बंदिशच!


संगीत हाच रानडेसरांचा ध्यास आहे. मग ते संगीत 'शास्त्रीय' असो 'लोक'. किंबहुना आपण ज्याला 'शास्त्रीय संगीत' म्हणतो, त्याला रानडेसर 'शास्त्रीय संगीत म्हणतच नाहीत. ते त्याला 'कलासंगीत' म्हणतात. या संदर्भातली आपली भूमिका मांडताना ते म्हणतात,'आज जे शास्त्रीय संगीत म्हणून ओळखलं जातं, तेच 'शास्त्रीय' आहे, असं कुणी सांगितलं? भारतातच नाही, तर जगातल्या प्रत्येक संगीतपरंपरेला स्वतःचं असं शास्त्र आहे. प्रत्येक संगीतात गायकाची, वादकाची विशिष्ट अशी भूमिका असते, त्यांच्या गाणं म्हणण्यात-वादनात विशिष्ट मेळ असतो. म्हणजे गायक वेगळं गातोय आणि वादक भलतंच काही वाजवतोय, असं नसतं ना! प्रत्येकच संगीत परंपरेत गाण्या-बजावण्याची एक सुसंगती असते. म्हणजेच शास्त्र असतं. मग ते लोकसंगीत असो किंवा आणखी कुठलंही संगीत. म्हणूनच मी रुढार्थाने सारे ज्याला 'शास्त्रीय संगीत' म्हणतात, त्याला मी 'कलासंगीत' म्हणतो.' असतो. तर 'जनसंगीत' म्हणजे लोकप्रिय संगीत. या संगीताचा प्रसार विविध माध्यमांमुळे होतो. सिनेमासंगीत हे एकप्रकारचं जनसंगीतच आहे. अगदी प्रत्येकाच्या घराला असलेल्या डोअर बेल किंवा विविध आवाजाचे गाड्यांचे हॉर्न हेही एकप्रकारचं जनसंगीतच आहे. मात्र हे संगीत त्या-त्या वेळी कितीही लोकप्रिय असलं, तरी त्याची अवस्था आज आहे नि उद्या नाही, अशी असते. शास्त्रीय संगीत म्हणजेच 'कलासंगीत' हा भारतीय संगीतपरंपरेतील एक महत्त्वाचा प्रकार आहे. गुरू-शिष्य परंपरेने शिकवल्या जाणाऱ्या या संगीतामागे काहीएक वैचारिकता असते. मात्र आजवर हिंदुस्थानी आणि कर्नाटक संगीत असेच दोनच कारण संगीतात जिथे पूर्वसुरींपेक्षा वेगळेपण प्रकटतं, तिथे घराणं तयार होतं, असं त्यांचं म्हणणं आहे. ते म्हणतात,'जेव्हा एखादा गायक-संगीतकार आपल्या रचनेत वेगळेपण दाखवतो, तिथे त्याचं नवं घराणं तयार होतं, असं मी मानतो. उदाहरणच द्यायचं झालं, तर रामजोशी या लावणीकाराचं देता येईल. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात लावणी लिहिणारे अनेक जण होते, परंतु त्या सर्वांत रामजोशींची लावणी वेगळेपणाने उठून दिसते. कारण तो मूळचा ब्राह्मण आणि कीर्तनकार असल्यामुळे त्याच्या रचनांमध्ये संस्कृतप्रचुरता आढळायची. होनाजीबाळानेही आपलं वेगळेपण असंच





संदेश घोसाळकर

**संगीततज्ज्ञ हा शब्द उच्चारला, तरी डोळ्यासमोर अशोक दा. रानडे यांचंच नाव येतं. संगीताबद्दल कुठलीही समस्या असली, तरी सर्वजण अशोक रानडे यांच्याशीच संपर्क साधतात. संगीत आणि संगीतरसिक-अभ्यासकांतील सेतू बनलेल्या अशोक दा. रानडे यांच्याशी साधलेला हा सांगीतिक सुसंवाद.**

# संगीततज्ज्ञ







> प्रत्येकच संगीत परंपरेत गाण्या-बजावण्याची एक सुसंगती असते. म्हणजेच शास्त्र असतं. मग ते लोकसंगीत असो किंवा आणखी कुठलंही संगीत. म्हणूनच मी रुढार्थाने सारे ज्याला 'शास्त्रीय संगीत' म्हणतात, त्याला मी 'कलासंगीत' म्हणतो.

सिद्ध केलंय. शिष्ट नसलेल्या भावनांना आपलं मानण्याची सोय महाराष्ट्रातल्या लावणीवाङ्मयात आहे. परंतु ही शृंगारवर्णनं सुरुवातीला राधा-कृष्णाच्या रूपांतून व्यक्त केली जायची. पण होनाजीबाळाने पहिल्यांदा 'लावण्यगुणाची खाणी, पती मज दावा गं कुणी' अशा शब्दांत हे वर्णन पहिल्यांदा मनुष्यासाठी कल्पिलं. यामुळे साहजिकच तोही वेगळा ठरला. याचप्रमाणे वेगवेगळ्या संतांनी आपल्या रचनेत आणि गायनातही विविधता राखलेली दिसते. ही विविधता म्हणजेच त्या-त्या संगीतपरंपरेतली घराणी होत, असं माझं म्हणणं आहे.'

## हृद्गत

रानडेसर शास्त्रीय संगीताला 'कलासंगीत' म्हणूनच थांबत नाहीत. तर शास्त्रीय संगीत म्हणजेच 'भारतीय संगीत', हाही एक गैरसमज असल्याचं सांगतात. कारण त्यांच्या मते, भारताच्या विविध प्रांतांत, विविध जातीजमातींत गायलं-वाजवलं जाणारं संगीत हे 'भारतीय संगीत' आहे. एवढंच नाही, तर भारतात संगीताचे वेगवेगळे प्रकार आहेत. मग केवळ कलासंगीतालाच 'भारतीय संगीत' का म्हणायचं? आपल्या या मताच्या पुष्टीसाठीच रानडेसरांनी भारतीय संगीताचे विविध प्रकार कल्पिले आहेत आणि त्यांची शास्त्रीय पद्धतीने मांडणीही केली आहे. या भारतीय संगीत प्रकारांविषयी माहिती देताना ते म्हणतात, 'भारतीय संगीताचे आदिम, लोक, धर्म, जन, कला आणि संगम असे विविध संगीतप्रवाह आहेत. मात्र मी जेव्हा 'आदिम संगीत' म्हणतो, तेव्हा तिथे मला आदिम म्हणजे वन्य जमातींचंच संगीत अपेक्षित नाही. कारण आदिम काळात मानव फेर धरून समूहाने नाचायचा, नाचताना आनंदाने-दुःखाने बेहोश होऊन ओरडायचा. मग ते फक्त तेव्हाच होतं का, तर नाही. आज होळीसारख्या सणाच्या वेळच्या नाच-गाण्यात त्याच आदिम संगीताचं रूप पाहायला मिळतं. मुख्य म्हणजे नृत्य समूहाने सादर केलं पाहिजे, ही आदिम भावना आजच्या होळीच्या नृत्यातूनही टिकून आहे. 'लोकसंगीत' म्हणजे अर्थातच प्रादेशिक संगीत. आदिम आणि लोकसंगीत हे प्रामुख्याने दिवस-रात्र, जन्म-मृत्यू आणि ऋतुचक्र या तीन चक्रांत गुंफलेलं आहे. ते या तीन चक्रांत उभं राहातं, तेव्हाच ते आपलं वाटतं. 'धर्मसंगीता'नेही भारतीय संगीताचा फार मोठा भाग व्यापलेला आहे. धर्मसंगीत म्हणजे एकप्रकारचं उपासनासंगीत आहे. भारतात जेवढे संत होऊन गेलेत, ते सर्व रचनाकारही होते आणि गायकही होते. त्यांच्याकडून प्रवर्तित झालेलं हे संगीत मौखिक परंपरेने पुढच्या पिढीकडे चालत आलेलं आहे. धर्मसंगीताचा विरल भाग साक्षात्कारी संगीताचा आहे. मात्र हा अनुभव व्यक्तिगत स्वरूपाचा कलासंगीताचे मुख्य भेद होते. पण आता ईशान्येकडील काही राज्यं, ओडिसी आणि केरळ ही राज्यंदेखील आमचं संगीत हे कलासंगीत असल्याचं सांगत आहेत. कारण काहीएक विचार प्रत्येकच संगीतामागे असतो. पण म्हणूनच 'संगीत नाटक अकादमी'ने कलासंगीतासाठी आता एक नियमावली तयार केली आहे. त्यातील निकषांना तुमच्या राज्याचं संगीत उतरलं, तरच त्या त्या संगीताला 'कलासंगीत' म्हणण्यात येईल, असं अकादमीने सांगितलं आहे. भारतीय संगीतातला आणखी एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे 'संगमसंगीत.' सध्याच्या रूढ भाषेत सांगायचं, तर फ्युजन. पण फ्युजन हा संगमसंगीताचा एक छोटा भाग झाला. संगम संगीतामध्ये दोन विकसित संगीत परंपरांचं एकत्र येणं अपेक्षित असतं. याचं एक प्राचीन उदाहरण म्हणजे ऋग्वेदातल्या सर्व ऋचा घेऊन सामवेद झाला. पण सामवेदात अशाही ७५ ऋचा आहेत, ज्या ऋग्वेदातल्या नाहीत. या पंच्याहत्तर ऋचा म्हणजे त्या वेळच्या निवडक चाली आहेत. म्हणजेच सामवेदात दोन वेगवेगळ्या विकसित परंपरा एकत्र आलेल्या दिसतात.'

रानडे सर संगम परंपरेचं अर्वाचीन उदाहरणही देतात आणि महत्त्वाचं म्हणजे हे उदाहरण ऐकून अनेकांना धक्का बसेल. 'देवळातल्या संगीतापासून नाट्यसंगीतापर्यंत मानाचं स्थान मिळवलेली पेटी हे चक्क पाश्चात्त्य वाद्य आहे. पेटी आणि व्हायोलिन ही दोन्ही वाद्यं पाद्र्यांनी भारतात आणली. पण पेटी इथल्या मातीशी-संगीताशी अशी एकजीव झाली की, तिच्या परदेशीपणाची कल्पनाही कुणी करणार नाही. संगम संगीतात असाच दोन संगीत परंपरांचा मिलाफ अपेक्षित असतो,' रानडेसर सांगत असतात.

भारतीय संगीतातील वेगवेगळ्या संगीतप्रवाहांचा रानडेसर उच्चार करतातच. पण जशी कलासंगीतात वेगवेगळी घराणी आहेत, तशीच घराणी भक्तिसंगीत किंवा लोकसंगीतातही असल्याचं त्यांचं म्हणणं आहे.

कलासंगीतात आजही घराण्यांचं मोठं प्रस्थ आहे. परंतु रानडेसरांच्या म्हणण्याप्रमाणे गायकाने कुठल्याही गुरूकडून गाणं शिकलेलं असू दे, जेव्हा तो गाणं गातो, तेव्हा ते गाणं त्याचं स्वतःचं आणि स्वतंत्र असतं. ते विशिष्ट घराण्याचं असलं, तरी व्यक्तिसापेक्ष गुणाने ते वेगळंच ठरतं. मग तिथे घराणं कुठे येतं?

अनेकदा सहजपणे एखाद्याला संगीत कळत नाही, असं म्हटलं जातं. पण रानडेसरांच्या म्हणण्यानुसार प्रत्येकाला संगीत कळत असतं. फक्त तुम्हाला कळतं, तेच त्याला कळेल असं नाही. त्याच्या आवडीचा संगीतप्रवाह दुसराच कुठला तरी असू शकतो, जो त्याला समजतो. मात्र भारतीय संगीतातलं हे वेगळेपण ओळखणारे, त्याचा अभ्यास करणारे अभ्यासक आता नाहीत, याची रानडेसरांना खंत आहे. शेवटी योग्य मूल्यमापन हेच कोणत्याही कलेच्या वृद्धीसाठी पोषक असतं आणि संगीततज्ज्ञ असलेल्या अशोक दा. रानडे यांनी केलेल्या योग्य त्या मूल्यमापनामुळेच तर भारतीय संगीताला आणखी झळाळी चढली आहे. ■

mukund.kule@prahaar.co.in

जागेअभावी आजच्या अंकात **'वाडी-वस्ती'** हे सदर प्रसिद्ध होऊ शकलेलं नाही.